# मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दातील जिंजीचे महत्त्व

**डॉ. शरद उत्तमराव गावंडे,**
इतिहास विभाग प्रमुख, वि. पा. शि. प्र. मं. सं., कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कन्नड जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)




**प्रस्तावना :-**

छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर स्वराज्य लगेच संपवता येईल असे स्वप्न पाहणाऱ्या औरंगजेबाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मराठ्यांची राजधानी रायगडाला वेढा दिला. या संकटातून स्वराज्याला वाचविण्यासाठी बराच खल झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाटकात वाढवलेल्या राज्यातून औरंगजेबाला विरोध करण्याची योजना आखली गेली. राजाराम महाराज व काही मुत्सद्दी जिंजीकडे निघाले. जिंजी येथे राजधानी स्थापून मराठ्यांनी मोगलांना दिलेला लढा मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दातील महत्त्वाचा भाग आहे. नोव्हेंबर १६८९ पासून नोव्हेंबर १६९७ पर्यंत जवळपास आठ वर्षे राजारामाचा मुक्काम जिंजी व त्याप्रदेशात होता. प्रस्तुत शोधनिबंधातून मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या काळातील जिंजी येथील घडलेल्या घडामोडींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**किल्ले जिंजी -** जिंजीचा किल्ला अकोटच्या दक्षिणेला व त्रिचनापल्लीच्या उत्तरेला आहे. त्याच्या एका बाजुला पूर्वाघाट तर दुसऱ्या बाजूला बंगालची खाडी आहे. हा महाकाय किल्ला मिश्रदुर्ग या प्रकारात मोडतो. स्थलदुर्ग आणि गिरिदुर्ग हे दोन्ही प्रकार या किल्ल्यात पाहावयास मिळतात.[i] प्रचंड खडकांनी हा किल्ला बनलेला आहे. त्यात फक्त एकच किल्ला नाही तर त्यात संरक्षित अशा तीन पहाडांचा म्हणजे राजगिरी, कृष्णागिरी, चंद्रायणदुर्ग अशा तीन किल्ल्यांचा अंतर्भाव होतो. जिंजीबाबत औरंगजेबाचा एक अधिकारी व त्याचा चरित्रकार मासिरे आलमगिरीचा लेखक साकी मुस्तैदखान म्हणतो, "जिंजीचा किल्ला डोंगरावर असून कर्नाटकात इतका मजबूत आणि युध्दास व रक्षणास असलेल्या साधनांनी समृध्द असा दुसरा किल्ला नाही.[ii]

छत्रपती शिवाजी महाराजांची दुरदृष्टि आपणास याकाळात अनुभवायास मिळते. राज्याभिषेक झाल्यानंतर शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिम हाती घेतली त्यावेळी त्यांनी विशालगड ते जिंजी अशी किल्ल्यांची तिसरी साखळी तयार करण्याचे काम केले. शिवाजी महाराजांनी वेल्लोर, जिंजी, तंजावर या किल्ल्यांची पुर्नउभारणी केली आणि कर्नाटकात आपले वर्चस्व निर्माण केले. आग्रा येथून परत आल्यानंतर मोगली आक्रमणाचा धोका महाराजांनी ओळखला होता. या धोक्याला भविष्यात तोंड देण्यासाठी त्यांनी कर्नाटकात ही सुरक्षेची योजना निर्माण केली होती. राजधानी रायगड जिंकून घेऊन मराठ्यांचे राज्य संपवता येईल या भ्रमात औरंगजेब होता. परंतु याचवेळी राजारामाला रायगडाहून कर्नाटकातील जिंजीला पलायन करता आले.[iii] शिवाजी महाराजांनी जिंजीच्या किल्ल्याकडे विशेष लक्ष पुरविले. मार्टिन लिहितो, "शिवाजीने जिंजी किल्ल्याची जागा बारकाईने पाहिली. जिंजीमुळे सुरक्षिततेची मोठी व्यवस्था होत होती. शिवाजीने आज्ञा केली की किल्ल्याच्या तटाचा काही भाग पाडावा आणि तट बांधावे. त्याप्रमाणे किल्ल्यामधील एका भागाचे काम आणि त्याच्याऐवजी तटबंदी उभारण्याचे काम जोरात चालू होते. "[iv]

शिवाजी महाराजांनी कर्नाटकात इ. स. १६७८-७९ मध्ये स्वारी केली. या स्वारीत त्यांनी जिंजी, वेलूर, तंजावर, कोलार, होसकोट, दोड्डा, बाळापूर हा प्रदेश जिंकला.[v] शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजी महाराजांनी स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला त्यावेळी त्यांना गृहकलहास तोंड द्यावे लागले. तसेच स्वराज्यावर चोहोबाजुने आलेल्या शत्रूशी सामना करावा लागला. अशा परिस्थितीतही संभाजी महाराजांनी कर्नाटकातील प्रदेशाकडे दुर्लक्ष केले नाही.[vi]

महाराष्ट्राच्या इतिहासात इ. स. १६८१ ते इ. स. १७०७ या कालखंडाला मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द म्हणून ओळखले जाते. या स्वातंत्र्ययुध्दाचे तीन भाग केले जातात. कालखंड पहिला संभाजी महाराजांचा कालखंड (इ. स. १६८१ ते १६८९), दुसरा भाग राजाराम महाराजांचा कालखंड (इ. स. १६८९ ते १७००) आणि तिसरा महाराणी ताराबाईचा कालखंड (इ. स. १७०० ते इ. स. १७०७). स्वातंत्र्ययुध्द काळात छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई असे तीन राज्यकर्ते मराठ्यांना लाभले. त्यापैकी संभाजी महाराजांच्या कारकीर्दीचा अंत मराठ्यांच्या छत्रपतीच्या वधाने झाला. छत्रपती राजाराम महाराजांचीही कारकीर्द संकटांनी भरलेली होती. त्यांना कर्नाटकात आसरा घ्यावा लागला. तरीही त्यांचे नेतृत्व अजोड होते. कुलकर्णी अ. रा. याबाबत म्हणतात, "छत्रपती राजारामांचा कालखंड मराठ्यांच्या इतिहासात निर्णायक कालखंड होता. त्या काळात स्वराज्याचे नेते छत्रपती राजाराम महाराज हे महाराष्ट्रात सदैव आदर्श ठरतील असे होते! मराठ्यांच्या इतिहासातील महापुरुषांतच त्यांची गणना करावी लागेल."[vii]

छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे अटक झाल्यानंतर छत्रपती पद कोणी धारण करायचे यावर खल होऊन राजाराम महाराजांना छत्रपती पदी बसविण्याचे ठरले. या नूतन छत्रपतीचे रक्षण ही महत्त्वाची गोष्ट असल्यामुळे त्यांना जिंजी किल्ल्यावर पाठविण्याचे ठरले. ०५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम महाराज रायगडावरून निघाले. वेल्लोरच्या आग्नेयेस पन्नास मैल जिंजी हे स्थळ आहे त्या ठिकाणी राजाराम महाराज १५ नोव्हेंबर १६८९ रोजी पोहोचले.[viii] पन्हाळगडावरून जिंजी गाठणे व तेथून मोगल सैन्यावर प्रतिहल्ले करून स्वराज्याचे रक्षण करणे महत्त्वाचे होते. कर्नाटक प्रांतातून लढा देण्यामुळे शत्रूसैन्य महाराजांच्या पाठलागावर कर्नाटक प्रांतात जाणार आणि त्याचा परिणाम मोगलांनी महाराष्ट्रात एकवटलेल्या शक्तीवर होणार हे निश्चित होते. त्यांचे सैन्यबळ विभागले जाऊन मोगल मराठा हा संघर्ष महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता तो कर्नाटक प्रांतातल्या विस्तिर्ण प्रदेशावर लढला जाणार आणि पुढे तसे झाले देखील.[ix]

राजाराम महाराज जिंजी येथे पोहोचल्यानंतर मागाहून रस्त्यात फुटलेली सर्व मंडळी हळूहळू येऊन त्यांना मिळाली. थोडी स्थिरस्थावर होताच मराठ्यांचे राज्य कायम आहे याची जाणीव सर्वत्र होण्याकरिता राजाराम महाराजांनी अष्टप्रधानांच्या नेमणुका करून राज्याचा व्यवस्थित कारभार चालू केला व स्वत: छत्रपती व राजचिन्हे धारण केली.[x] राजाराम महाराजांच्या नंतर त्यांचा कबिला जिंजीला पोहोचल्याचे कळते. राजाराम महाराज जिंजीस नोव्हेंबर १६८९ ला आले आणि त्यांनी जिंजीचा कारभार हाती घेतला.[xi] त्यांनी जिंजीस मराठ्यांची कर्नाटकातील राजधानी निर्माण केली. कर वसूल करणे, नव्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे, ठाणी व

किल्ले यांचा बंदोबस्त राखणे, नवे लष्कर उभारणे, मोगलांशी लढण्यासाठी कर्नाटकातील हिंदु नायकांचे सहकार्य मिळविणे आणि राज्यकारभार तसेच मोगलांशी युध्द करण्यासाठी पैसा मिळविणे यासारखी कार्ये आता जिंजीतून सुरू झाली.[xii]

मद्रास येथील इंग्रज व्यापारी राजाराम महाराज जिंजीस येण्याचे कारण लिहितात,"राजाराम महाराज जिंजीस जाण्याचा हेतू, स्वराज्यातून मोगल सैन्य बाहेर खेचणे, मद्रास प्रांतातील हिंदू सरदारांची संघटना घडवून आणणे आणि सैन्य जमवून विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये परत जिंकून घेणे"[xiii] ह्याला प्रल्हाद निराजीच्या खालील वाक्याने पुष्टी मिळते.("सत्वर कर्नाटकास जावे आणि निरलसपणे स्वराज्य रक्षणाचा प्रयत्न करावा.") [xiv] राणी येसूबाईचा सल्ला असा "शत्रूचे प्राबल्य विशेष. त्याअर्थी चंदीचंदावर प्रांती दम खाऊन पुन्हा मसलत बळवून राज्य साधनही करणे पडेल ते करावे" ह्यावरून मराठ्यांच्या लष्करी धोरणाचा उलगडा होतो.[xv]

राजाराम महाराज जिंजीला गेल्याचे कळताच औरंगजेबाने रायगडचा पाडाव करणारा झुल्फिकारखानाची नेमणूक जिंजीवर केली. २९ ऑगस्ट १६९० रोजी जिंजीचा वेढा सुरु झाला. छत्रपती राजाराम महाराजांच्या कर्नाटक प्रांतात जाण्याने बादशहा औरंगजेबाचे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्याचे स्वप्न भंग पावल्याचे चिन्ह दिसू लागले. सन १६९० च्या ऑगस्टमध्ये सुरू झालेला वेढा प्रथम सुरु झाला तो नीट चालत नाही असे खानाने बादशहास कळविले. तेव्हा त्याने आपला पुत्र कामबक्ष व वजीर आसद खान यांच्याबरोबर भली जंग फौज देऊन जिंजीस पाठवली ती १६९१ च्या अखेर जिंजीस पोहोचली.[xvi]

कर्नाटक प्रांताच्या सरहद्दीवर मराठ्यांना रोखण्यासाठी बादशहाने जाननिसारखान व तहब्बुरखान यांची नेमणुक केली. इ. स. १६९१ च्या सुमारास संताजी - धनाजीच्या फौजा उत्तर कर्नाटकातील प्रदेशात धुमाकुळ घालत असताना त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी जाननिसारखान व तहब्बुरखान यांना मोठ्या सैन्यासह पाठविले. परंतु वाटेतच संताजीने गाठले व झालेल्या युध्दात पराभवाचे तोंड त्यांना पाहावे लागले. मोगलांची युध्दसामुग्री व तोफखाना मराठ्यांच्या हाती लागला.[xvii] सर्वत्र संताजी व धनाजीने हैदोस घातला. धनाजीने ईस्माईल खानास कैद केले. संताजीने अलिमर्दान खानावर विजय मिळविला. संताजी व धनाजीने अनुक्रमे अलिमर्दान खान व ईस्माईल खान यांच्यासारख्या मोठ्या सरदारांना कारागृहात डांबले असताना मोगल छावणीमध्ये गृहकलहाच्या वातावरणाने सावळा गोंधळ निर्माण झाला. मराठ्यांच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्याने अन्नधान्य व मुक्या जनावरांच्या चाऱ्याचे हाल होत असताना झुल्फिकारखान मात्र कामबक्षाचे कारस्थान मोडण्यात व्यस्त होता. झुल्फिकारखानाला वांदिवाशपर्यंत माघार घेणे भाग पडले.

दरम्यानच्या काळात सेनापती संताजी घोरपडे नाराज होऊन सेनापापती पद धनाजी जाधवला देण्यात आले. झुल्फिकारखान जिंजीला पुन्हा वेढा देण्याची तयारी करु लागला. २४ ऑक्टोबर १६९३ रोजी मद्रासकर इंग्रज लिहितात की, "झुल्फिकारखान जिंजीपुढे आला असून बहिर्जी व याचप्पा नाईक यांच्या सोडून जाण्यामुळे राजारामाची अवस्था नाजूक बनली आहे. तसेच खानाने जर किल्ला घेण्याचे मनापासून प्रयत्न केले तर तो किल्ला अल्पावकाशात घेऊ शकेल.[xviii] दरम्यानच्या काळात इ. स. १६९६ च्या मे जून महिन्यात संताजी व धनाजी यांच्यात वितुष्ट आले. संताजी एका बाजुला तर राजाराम महाराज, धनाजी जाधव, इतर सरदार व मुत्सद्दी मंडळी एका बाजुला झाली. संताजी व धनाजीमध्ये यादवी युध्द झाले. मोगलांनी जिंजी ताब्यात घेण्यासाठी कंबर कसली. जिंजीचा अंतिम लढा ऑगस्ट १६९० मध्ये सुरू होऊन तो जानेवारी १६९८ मध्ये मोगलांच्या ताब्यात गेला. राजाराम महाराज २६ डिसेंबर १६९७ रोजी जिंजीच्या बाहेर पडले व १६९८ च्या मार्चच्या शेवटच्या आठवड्यात पन्हाळ्याला पोहाचले तेथून नंतर विशालगडला गेले.[xix] जिंजीच्या ७-८ वर्षाच्या वास्तव्यात परकियास औदार्याने जिंकले. सत्यप्रियता व स्वकार्यदक्षता, स्वाभिमान आणि स्वधर्मप्रियता हे अलौकिक गुण त्यांच्या ठिकाणी होते.[xx]

**उपसंहार -**

अशापध्दतीने मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या दुसऱ्या कालखंडात मराठेशाहीवर मोठे संकट आले असताना छत्रपती राजारामास महाराष्ट्र सोडून कर्नाटक प्रांतातील जिंजीला जाऊन तेथे राजधानी निर्माण करून स्वातंत्र्ययुध्दाचे नेतृत्व करावे लागले. मराठा राज्याच्या छत्रपतीला जवळपास आठ वर्षे जिंजी येथे राजधानी करून राहावे लागले. राजधानी जिंजीने मराठेशाहीच्या छत्रपतीचे संरक्षण तर केलेच पण मोगलांना दोन आघाड्यांवर लढण्यासाठी बाध्य केले. राजाराम महाराज यांच्या जिंजीकडे जाण्यामुळे मोगलांचे सैन्यबळ विभागले गेले. छत्रपतीच्या संरक्षणासाठी सर्वस्व पणाला लावणारे संताजी व धनाजी व तितक्याच कार्यक्षमतेने महाराष्ट्रातील कारभार सांभाळणारे रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण यांची भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे.

तसेच बादशहाच्या निधनानंतर कर्नाटक प्रांतातील (दक्षिणेतील) राज्याची स्वप्न पाहणारा व त्यासाठी भविष्यामध्ये मराठ्यांची मदत मिळेल म्हणून जिंजीचा वेढा शिथिल ठेऊन राजारामाला मदत होईल असा वागणारा झुल्फिकारखानाची भुमिका निश्चितच बादशहाच्या दृष्टिने संशयित होती. मात्र त्याचा फायदा मराठेशाहीला झाला व आठ वर्षे शत्रुच्या वेढ्यात अडकलेला छत्रपती २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशालगडावर पोहोचला. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दातील हा महत्वाचा टप्पा जिंजी येथून लढल्यामुळे यशस्वी ठरला. कर्नाटक प्रांतात राजधानी स्थापन करून मोगलांविरोधात संघर्ष चालु ठेवण्याचा राजाराम महाराजांचा निर्णय युध्दशास्त्राच्या दृष्टिकोनातून अगदी अचूक होता असे दिसून येते.

---

[i] तेंडुलकर महेश, रणझुंजार सेनापती संताजी घोरपडे, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१२, पृष्ठ १०.

[ii] शिवदे स. स., महाराणी ताराराणी, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१४, पृष्ठ १७.

[iii] कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतितहास, खंड - १, शिवाजी आणि शिवकाळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ ३३६.

[iv] सेतू माधवराव पगडी, छत्रपती शिवाजी, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, २०१३, पृष्ठ १३२.

[v] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ २९१.

[vi] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ २९१.

[vii] कुलकर्णी अ. रा., मराठ्यांचा इतिहास, खंड - १, शिवाजी आणि शिवकाळ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ ४४०.

[viii] सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड २, उग्रप्रकृती संभाजी- स्थिर बुध्दी राजाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृष्ठ १६१.

[ix] तेंडुलकर महेश, रणझुंजार सेनापती संताजी घोरपडे, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१२, पुष्ठ ३२.
[x] सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड २, उग्रप्रकृती संभाजी - स्थिर बुध्दी राजाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृष्ठ १८०.
[xi] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३६७.
[xii] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३६७.
[xiii] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३३२.
[xiv] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३३२.
[xv] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३३२.
[xvi] सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड २, उग्रप्रकृती संभाजी - स्थिर बुध्दी राजाराम, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृष्ठ १६५.
[xvii] तेंडुलकर महेश, रणझुंजार सेनापती संताजी घोरपडे, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१२, पृष्ठ ४८.
[xviii] Records of Ford. St. George Diary and Constution Book Ltd., Madras Record Office, Madras, १६९३, p- ३८.
[xix] पवार अप्पासाहेब (संपा.) ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९, पृष्ठ ४७७.
[xx] वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड, भाग - १ शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृष्ठ ३६७.